

**बिसेन डेन्टल केअर**

डॉ.दिप(पंकज) बिसेन  डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक २८ | बुधवार, दि.१७ ते २३ जून २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# निवडणूक आयोगाच्या 'त्या' जीआरमुळे ओबीसींवर अन्याय

## अपूर्णांकाच्या चक्रव्यूहात हक्काच्या जागा घटल्या !

**गोंदिया:-** राज्य निवडणूक आयोगाने २५ मे ०२६ रोजी जारी केलेल्या स्थानिक स्वराज्य स्थांच्या निवडणूक आरक्षण विषयक नवीन र्गदर्शक नियमावलीमुळे ग्रामीण भागातील बीसी समाजात तीव्र असंतोष पसरला आहे. नव्या आदेशातील मअपूर्णांक नियमफ यांमुळे बीसी उमेदवारांचे राजकीय गणित पूर्णपणे घडले असून हक्काच्या जागांवर पाणी डण्याची वेळ आली आहे.

यावेळच्या जीआरमधील सर्वात वादग्रस्त म्हणजे आर-क्षणाची टक्केवारी काढताना गारे अपूर्णांक कसे मोजायचे हा आहे.

### एकत्रित आरक्षणावर ५० टक्के ची मर्यादा

**ग्रामपंचायतीमधील एकूण एकत्रित आरक्षण अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच ओबीसी हे ५० टक्क्यांपेक्षा जास्त जाता कामा नये, असा नियम आहे. अर हे आरक्षण ५० टक्के च्यावर जात असेल, तर एकूण आरक्षण ५० टक्के च्यामयदित आणण्यासाठी फक्त ओडीसी प्रवर्गाच्या २७ टक्के जागा कमी केल्या जातील.**

च्या नियमानुसार, आरक्षणाची संख्या बढताना जर आकडा अर्ध्यापेक्षा जास्त म्हणजे १.५१ किंवा २.७५ असा आला, तर तो पुढील पूर्ण अंक म्हणजे अनुक्रमे २ आणि ३ जागा धरला जायचा. मात्र, २५ मे च्या नव्या नियमान-ुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या ५०टक्के आरक्षण मर्यादेचे कारण पुढे करत, अपूर्णांक कितीही मोठा म्हणजे ०.७५ किंवा ०.९५ असला तरीही तो पुढील पूर्ण अंक न धरता थेट खालचा अंक धरला जाणार आहे. म्हणजेच, एख-ाद्या ग्रामपंचायतीत ओबीसींच्या वाटचाला २.८५ जागा येत असतील, तर वरचे ०.८५ शून्य मानून तिथे ३ ऐवजी केवळ २च जागा दिल्या जातील.

या गणितीय नियमांच्या नव्या

**अशा होणार ओबिसी प्रवर्गातील जागा कमी**

| अ.क्र | ग्रामपंचायत सदस्य संख्या | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग जागा सदस्य संख्येच्या २७ टक्के | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी जास्तीत जास्त देय सदस्य संख्या अपूर्णांक दुर्लक्षित होईल |
|---|---|---|---|
| १ | ७ | १.८९ | १ |
| २ | ९ | २.४३ | २ |
| ३ | ११ | २.९७ | २ |
| ४ | १३ | ३.५१ | ३ |
| ५ | १५ | ४.०५ | ४ |
| ६ | १७ | ४.५९ | ४ |

अर्थामुळे वाशिमसह राज्यातील अनेक जिल्ह्यांत ओबीसींचे हक्काचे २७ टक्के आरक्षण थेट ११ टक्के ते १५ टक्के वर घसरणार आहे. या

तांत्रिक त्रुटीमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील सुमारे १२ ते १५ हजार ग्रामपंचायत प्रभागांमध्ये ओबीसीचे आरक्षण कमी होणार आहे.

अपूर्णांकाचा हा जाचक नियम म्हणजे बहुजन समाजाचे राजकीय प्रतिनिधित्व पद्धतशी-रपणे संपवण्याचा डाव आहे, असा आरोप होत आहे.

# घरगुती ग्राहकांवर स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती

**नागपूर:-** राज्यात स्मार्ट मीटरच्या अंमलबजावणीवरून वाद अधिक तीव्र होत असतानाच मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभेतील एका जुन्या भाषणाची क्लिप सोशल मीडियावर पुन्हा व्हायरल झाली आहे.त्यात सामान्य घरगुती ग्राहकांवर स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती केली जाणार नाही, असे फडणवीस सांगताना दिसत आहेत. दुसरीकडे महावितरणकडून स्मार्ट मीटर बदलासाठी पाठविण्यात येणाऱ्या ४८ तासानंतरच्या नोटिसांविरोधात ग्राहकांकडून लेखी व कायदेशीर नकार अर्ज मोठ्या प्रमाणात प्रसारित केला जात आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरचा मुद्दा पुन्हा राज्यभर चर्चेचा विषय ठरला आहे.




### फडणवीसांची कोणती क्लिप व्हायरल होत आहे?

सोशल मीडियावर फिरत असलेल्या व्हिडिओमध्ये देवेंद्र फ डणवीस विधानसभेत स्मार्ट मीटर धोरणाबाबत बोलताना दिसतात. सामान्य ग्राहकांवर स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती होणार नसल्याचा उल्लेख या भाषणात असल्याचा दावा व्हिडिओ शेअर करणाऱ्यांकडून केला जात आहे. त्यामुळे सध्याच्या अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

याच वेळी मलेखी नकार अर्जफ चर्चेत का आला आहे?

महावितरणकडून स्मार्ट मीटर बदलासाठी ग्राहकांना एसएमएस किंवा इतर माध्यमातून पूर्वसूचना दिली जात आहे. त्यानंतर अनेक ठिकाणी ग्राहक संघटना आणि नागरिकांनी स्मार्ट मीटरविरोधात लेखी नकार देण्याचे आवाहन सुरु केले आहे. यासाठी तयार करण्यात आलेला नमुना अर्ज व्हॉट्सॲप आणि सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर केला जात आहे.या अर्जात नेमके काय म्हटले आहे?

अर्जात ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसवू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच मीटर बदलण्याची प्रक्रिया, पूर्वसूचना आणि कायदेशीर तरतुदींचा उल्लेख करून महावितरणला लेखी हरकत नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.अर्जात कोणते कायदेशीर मुद्दे मांडण्यात आले आहेत?

अर्जामध्ये केंद्र सरकारच्या १७ ऑगस्ट २०२१ च्या अधिसूचनेचा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच उच्च न्यायालयातील याचिकांचा संदर्भ देत ग्राहकांच्या संमतीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. मात्र या दाव्यांबाबत अंतिम कायदेशीर भूमिका न्यायालयीन निर्णय आणि अधिकृत स्पष्टीकरणांवर अवलंबून राहणार आहे.

### ४८ तासानंतरच्या नोटिसांवर आक्षेप का घेतला जात आहे?

व्हायरल अर्जात मीटर बदलासाठी अधिक कालावधीची पूर्वसूचना अपेक्षित असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे केवळ ४८ तासांची सूचना पुरेशी नसल्याचे काही ग्राहकांचे म्हणणे आहे. यावर महावितरणकडून अधिकृत भूमिका स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

# कलपाथरी प्रकल्पाच्या सिंचन क्षेत्रात मोठी घट;कालव्यांचे निर्माण अपूर्णच




**गोरेगाव:-** तालुक्यात कलपाथरी मध्यम प्रकल्प योजना वर्ष १९९९-२००० मध्ये सुरू करण्यात आली होती. या योजनेमुळे परिसरातील १,९१५ हेक्टर क्षेत्राला सिंचनाची सोय उपलब्ध होईल, असा दावा सुरुवातीला करण्यात आला होता. आज या प्रकल्पाच्या बांधकामावर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे, परंतु इतकी वर्षे उलटूनही हा प्रकल्प अपूर्णच असल्याने शेतकरी आता संतप्त सवाल उपस्थित करत आहेत.

कलपाथरी योजनेतून पूर्ण क्षमतेने सिंचनाची व्यवस्था का होत नाही आणिहा प्रकल्प आणखी किती दिवस अंधारात राहणार, असा प्रश्न विचारला जात आहे. या अपूर्ण प्रकल्पामुळे सध्या केवळ ५०० हेक्टर जमिनीलाच सिंचनाचा लाभ मिळत असून उर्वरित क्षेत्र पाण्यापासून वंचित आहे. गोरे-गाव, सडक अर्जुनी, देवरी आणि सालेकसा येथील शेतकऱ्यांना सिंचन सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने वर्ष २००० मध्ये ही योजना सुरू झाली होती. यासाठी कलपाथरी आणि आसपासच्या गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित करण्यात आल्या होत्या आणि कलपाथरी गावाचे पुनर्वसन देखील करण्यात आले होते. मात्र, प्रशासकीय अनास्थेमुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आजही अंधारातच रखडला आहे.

या योजनेद्वारे गावांमध्ये पाण्याचा पुरवठा केला जाणार होता. संबंधित गावे जमिनीपासून उंचावर असल्याने तिथे पाण्याचे वहन करण्यासाठी कालव्यांचे (नहर) निर्माण करण्यात आले होते. परंतु देखभालीअभावी हे कालवे आता पूर्णपणे जर्जर आणि दुरवस्थेत पोहचले आहेत. परिणामी, मूळ १,९१५ हेक्टर सिंचन क्षमतेच्या तुलनेत आज प्रत्यक्षात फक्त ५०० हेक्टर क्षेत्रातच सिंचन होऊ पाहत आहे. या प्रकल्पामुळे आपल्या भागात हरित क्रांती येईल, असे स्वप्न पाहणारे स्थानिक शेतकरी आजही हा प्रकल्प पूर्ण होण्याच्या आशेने प्रशासनाकडे डोळे लावून बसले आहेत.

### ३३८ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन

गोरेगाव तालुक्यातील कलपाथरी मध्यम प्रकल्प अंतर्गत ५५६. १४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी भूमी संपादन अधिनियमांतर्गत २४ फेब्रुवारी २००० रोजी एक अधिसूचना जारी करण्यात आली होती. भूसंपादन नियमांनुसार, या बाधित क्षेत्रातील ३ गावांमधील एकूण ३३८ खातेदारांना गोरे-गाव शहराजवळ जमिनीचे भूखंड (प्लॉट) आवंटित करून त्यांचे पुनर्वसन करण्यात आले होते, अशी माहिती समोर आली आहे.

# जिल्ह्यातील धरणात पाणीसाठा अल्प,पाणीटंचाईचे संकट

**गोंदिया :** मान्सूनचे आगमन लांबल्याने आणि उन्हाळ्याच्या तीव्र तडाख्यामुळे गोंदिया जिल्ह्यातील जलस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. जलसाठा अहवालानुसार जिल्ह्यातील मध्यम, लघु व स्थानिक स्तरावरील एकूण ६६ जलप्रकल्पांमध्ये सरासरी केवळ १२.४८ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून अनेक प्रकल्पांतील पाण्याची पातळी धोकादायकरीत्या खालावली आहे.

अहवालानुसार जिल्ह्यातील सर्व प्रकल्पांची एकत्रित संकल्पित क्षमता ११०.५२१ दशलक्ष घनमीटर असून सध्या केवळ १३.७९८ दशलक्ष घनमीटर उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता प्रशासनाने उपलब्ध साठ्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले आहे.

मध्यम प्रकल्पांमध्ये तुलनेने सम ाधानकारक, तरीही चिंताजनक स्थिती : जिल्ह्यातील ९ मध्यम प्रकल्पांची एकूण संकल्पित क्षमता ९९.७५ दशलक्ष घनमीटर असून त्यामध्ये सध्या २०.१८ दशलक्ष घनमीटर (२०.२४ टक्के) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे.प्रमुख मध्यम प्रकल्पांमध्ये चुलबंद प्रकल्पात सर्वाधिक ३६.८४ टक्के साठा उपलब्ध असून बोदलकसा प्रकल्पात २७.०८ टक्के, रेंगेपारमध्ये २३.७० टक्के, खैरबंदामध्ये १५.२२ टक्के, मानगडमध्ये १५.२६ टक्के, चोरखमारा प्रकल्पात १३.१६ टक्के साठा उपलब्ध आहे.

मात्र संग्रामपूर मध्यम प्रकल्पातील स्थिती अत्यंत गंभीर असून तेथे केवळ ४.२२ टक्के उपयुक्त साठा उरला आहे. त्यामुळे परिसरातील गावांमध्ये भविष्यात पाणीटंचाईची समस्या निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

लघु प्रकल्पांची अवस्था बिकट : जिल्ह्यातील २० लघु प्रकल्पांची एकत्रित क्षमता ६४.५६६ दशलक्ष घनमीटर असून त्यामध्ये सध्या फक्त ६.५११ दशलक्ष घनमीटर (१०.११ टक्के) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे.काही प्रकल्पांमध्ये पाणीसाठा मृत साठ्याजवळ पोहोचला असून मुंडीपार, पळसगाव, पालडोंगरी आदी प्रकल्पांतील जलपातळी अत्यंत खालावल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

माजी मालगुजारी तलावांमध्ये केवळ ८.१५ टक्के पाणी : जिल्ह्या-तील ३६ माजी मालगुजारी तलावांची एकत्रित क्षमता २४.१९४ दशलक्ष घनम ीटर असून त्यामध्ये अवघा १.९८८ दशलक्ष घनमीटर (८.१५ टक्के) साठा शिल्लक राहिला आहे. ग्रामीण भागातील अनेक तलावांमध्ये बाष्पीभवनाचा वेग वाढल्याने पाण्याची पातळी झपाट्याने घटत असल्याचे चित्र आहे.

# जि.प. शाळांचा प्रवे-शोत्सव ३० जून रोजी

**गोंदिया :** शैक्षणिक वर्षात जिल्हा परिषदेच्या शाळा १५ जून रोजी उघडणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, शिक्षक संघटनांनी २६ जूनचा आग्रह धरला. त्यातच शिक्षण विभागाने २२ जून रोजी शाळा उघडण्याचे आदेश जारी केले. त्यामुळे एकीकडे शाळा प्रवेशोत्सवाची तयारी करत असताना दुसरीकडे न्यायालयाने विदर्भातील शाळा ३० जूनपासून सुरू करण्याचे आदेश दिले. त्यामुळे शाळा उघडण्याच्या विविध चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. त्यामुळे यंदा ३० जूनपासून सत्रारंभहोणार आहे.

विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तके मिळावीत, यासाठी मबालभारतीफकडून तालुकास्तरावर प्राप्त झालेल्या पुस्तकांचे वितरण येत्या दोन आठवड्यांत होणार आहे. आतापर्यंत १०० टक्के पाठ्यपुस्तके प्राप्त झाली आहेत. जिल्ह्यात सर्व इयत्तांची सर्व पाठ्यपुस्तके प्राप्त झाली आहेत. नगरपालिका आणि सर्व अनुदानित प्राथमिक व म ाध्यमिक शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना ही पुस्तके दिली जातात. विदर्भात तापमान लक्षात घेता ३० जूनप-ासून शाळेची पहिली घंटा वाजणार आहे.

# लहान गावांमध्ये कफ सिरप विक्रीवर आता कडक निर्बंध

**परवानाधारक औषधविक्रेत्यांकडूनच विक्री अनिवार्य, केंद्र सरकारचा निर्णय**



**नवी दिल्ली,:** केंद्र सरकारने देशभरातील औषध विक्रीच्या नियमांमध्ये महत्त्वपूर्ण सु-धारणा करत लहान गावांमध्ये कफ सिरप विक्रीसाठी उपलब्ध असलेली विशेष सवलत रद्द केली आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने औषधे नियम,१९४५ मध्ये सु-धारणा करून हा निर्णय लागू केला आहे.

आरोग्य मंत्रालयाने २९ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार अनुसूची "केफ मधील नोंद क्रमांक १३(७) मध्ये बदल करण्यात आला असून, त्यातून "सिरप' हा शब्द वगळण्यात आला आहे. यापूर्वी १,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये परवान-ाधारक औषधविक्रेता उपलब्ध नसल्यास काही अटींवर कफ सिरप विक्रीस सवलत होती. नव्या सुधारणेमुळे ही सवलत रद्द करण्यात आली आहे.

त्यामुळे आता देशातील सर्व गावांमध्ये कफ सिरपची विक्री आणि वितरण औषधे व सौंदर्यप्रसाधने कायदा, १९४० तसेच संबंधित नियमांचे पालन करूनच करावे ला-गणार आहे. यासाठी परव-ानाधारक औषधविक्रेत्यामाफ 'तच औषधांची विक्री करणे बंधनकारक राहील.

कफ सिरपच्या वापरावर अधिक प्रभावी देखरेख ठेवणे, संभाव्य गैरवापराला आळा घा-लणे आणि सार्वजनिक आरोग्य व सुरक्षेला बळकटी देणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. तसेच औषध उत्पादक, वितरक आणि किरकोळ विक्रेत्यांनी संबंधित कायदे व नियमांचे काटेकोर पालन करावे, असे निर्देशही मंत्रालयाने दिले आहेत.

# तंबाखू माफियांचे नेटवर्क एफडीएच्या निशाण्यावर

**गोंदिया:** गुटखा, तंबाखू आणि निकोटीनयुक्त पानमसाल्याच्या अवैध व्यापारातून कोट्यवधींची उलाढाल करणाऱ्या तंबाखू माफियांवर आता थेट महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) लागू करण्याची तयारी सुरू झाली आहे. जिल्ह्यात १ मार्च ते १५ जून या साडेतीन महिन्यांत अन्न व औषध प्रशासनाने सहा धडक कारवाया करून सुमारे १६ लाख रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त केला आहे. मात्र, वारंवार कारवाई होऊनही अवैध व्यापार थांबत नसल्याने आता केवळ किरकोळ विक्रेत्यांवर नव्हे तर उत्पादक, पुरवठादार, वाहतूकदार, गोदाम चालक आणि वितरकांच्या संपूर्ण साखळीवर मकोकाअंतर्गत कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.प्रतिबंधित अन्नपदार्थाच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर बंदी असतानाही काही भागांत संघटित पद्धतीने अवैध व्यापार सुरू असल्याचे निर्दशनास आले आहे. बनावट कागदपत्रे, बेनामी व्यवहार, गुप्त गोदामे आणि आंतरराज्य पुरवठा साखळीच्या माध्यमातून हे जाळे कार्यरत असल्याचे तपासात समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गंभीर प्रकरणांमध्ये मकोका लागू करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

# निवडणुकीला ८ महिने शिल्लक तरीही,समाजल्याण सभापतीच्या कक्षाची तोडफोड

## जिल्हा परिषदेत निधीची उधळपट्टी; निवडणुकीआधी लाखोंचा चुराडा?



**गोंदिया :** मिनी मंत्रालय म्हणून ओळख असलेल्या येथील जिल्हा परिषदेत शासकीय नियमांना तिलांजली देत जिल्हा निधीची उधळपट्टी सुरू आहे.कोरोना काळानंतर अस्तित्वात आलेल्या जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी करीता सामान्य प्रशासन विभागाने दोन वर्ष बंद राहिल्याने खराब झालेल्या सभापती कक्षांचे नुतनीकरण केले होते.त्या अंतर्गतच समाजकल्याण सभापतींसाठी असलेल्या कक्षाचेही आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये दुरुस्ती करण्यात आलेला कक्ष पुन्हा तोडण्यात येत असून, नुतनीकरणाच्या नावाखाली लाखो रुपयांचा निधी खर्च केला जात असल्याची चर्चा जिल्हा परिषद वतुर्ळात आहे.

विशेष म्हणजे, सभापती बदलला की कक्षाची तोडफोड, डागडुजी आणि नव्याने सजावटीचे काम करण्याची परंपराच जिल्हा परिषद प्रशासनाने सुरू केल्याचे दिसते.जिल्हा परिषदेत कोरोनानंतर खराब झालेल्या कक्षाचे तत्कालीन समाजकल्याण समिती सभापती यांच्या कार्यकाळत नुतनीकरण करण्यात आले होते. हा कक्ष सु-सज्ज असा होता. नुतनीकरणाची कोणतीही आवश्यकता नव्हती.तरीही विद्यमान सभापतींनी कक्ष तोडून नव्याने बांधकाम करण्याचा हट्ट कुठल्या लोकोपयोगी योजनेकरीता किंवा विकासात्मक धोरण म्हणुन केले कुणालाच ठाऊक नाही.त्यातही शासन निर्णयाप्रमाणे ५ वर्षात एकदाच कक्षाची रंगरंगोटी व दुरुस्ती करण्याचा नियम असताना बांधकाम विभागानेही या नियमाला तिलांजली दिल्याचे या ठिकाणी दिसून येत आहे.जिल्हा परिषद निवडणुकीला वर्षभराचाही कालावधी शिल्लक राहिलेला नाही. त्यामुळे नुतनीकरणाच्या नावावर निधी खर्च करण्यामागील नेमका उद्देश काय, असा सवाल उपस्थित होत आहे.उल्लेखनीय म्हणजे, ग्रामीण भागातील अनेक विकासकामे निधीअभावी रखडलेली असताना प्रशासकीय कक्षांच्या सौंदर्यीकरणावर आणि नुतनीकरणावर निधी खर्च करणे म्हणजे संशयाला जागा देण्यासारखे आहे.

दरवेळी नव्याने बांधकामे आणि तोडफोड केल्यामुळे केवळ आर्थिक नुकसानच होत नाही, तर जिल्हा परिषदेच्या इमारतीच्या मूळ संरचनेलाही धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. सार्वजनिक निधीचा वापर काटेकोरपणे आणि गरजेनुसार होणे अपेक्षित असताना जिल्हा परिषदेत मात्र त्याचे विपरीत चित्र दिसून येत आहे. निवडणूक जवळ येत असताना प्रशासन आणि पदाधिकाऱ्यांकडून निधी खर्च करण्याची घाई सुरू झाली आहे का, अशीही चर्चा सुरू झाली आहे.

# तुमसर नगरपरिषदेच्या भोजन कंत्राट प्रकरणाची आर्थिक गुन्हे शाखेकडे चौकशी

## कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांमुळे प्रकरणाला नवे वळण

**तुमसर:-**तुमसर नगरपरिषद निवडणूक २०२५ दरम्यान कम 'चाऱ्यांच्या भोजन कंत्राटात कथित आर्थिक गैरव्यवहार आणि पदाचा गैरवापर झाल्याच्या आरोपांप्रकरणी महत्त्वपूर्ण घडामोड समोर आली आहे. तुमसर पोलीस स्टेशनने या प्रकरणाचा चौकशी अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत पुढील कायदेशीर कारवाईसाठी आर्थिक गुन्हे शाखा, भंडारा यांच्याकडे वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

स्वराज्य युवा एकता फ ाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अमि त मेश्राम यांनी मआपले सरकारफ पोर्टलवर दाखल केलेल्या तक्रारीत नगरपरिषद निवडणुकीदरम्यान कम 'चाऱ्यांच्या भोजनाचे कंत्राट देताना कायदेशीर निविदा प्रक्रियेचे पालन करण्यात आले नसल्याचा आरोप केला आहे. या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा दावा त्यांनी तक्रारीत केला आहे.

तक्रारदाराने नगरपरिषदेच्या आरोग्य विभागातील लिपिक नितेश भवसागर यांनी लोकसेवक असताना पदाचा गैरवापर करून आर्थिक हितसंबंध जपल्याचा आरोप केला आहे. तसेच या




संदर्भात नगरपरिषदेचे मुख्याधिकारी करणकुमार चव्हाण यांच्याकडे तक्रार करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. संबंधितांवर विविध कायदेशीर कलमान्वये गुन्हे दाखल करण्याची मागणी तक्रारदाराने केली आहे.

दरम्यान, तुमसर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमित म `श्राम यांनी याच विषयावर स्थानिक पोलीस ठाण्यातही तक्रार दिली असून त्यांचा जबाब नोंदविण्यात आला आहे. सध्या या प्रकरणात कोणताही दखलपात्र अथवा अद-खलपात्र गुन्हा नोंद झालेला नसून चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. तसेच या तक्रारीम ुळे कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होणार नसल्याचेही सांगण्यात आले आहे.

प्रकरणाचा संबंध नगरपालिकेच्या अंतर्गत आर्थिक व्यवहारांशी आणि कथित अनियमिततेशी असल्याने सखोल चौकशी आवश्यक असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. वरिष्ठांच्या आदे-शानुसार चौकशी अहवाल आर्थिक गुन्हे शाखा, भंडारा यांच्याकडे पुढील तपासासाठी वर्ग करण्यात येत असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले.

या घडामोडीनंतर नगरपरिषदेच्या भोजन कंत्राट प्रकरणातील वस्तुस्थिती काय समोर येते आणि आर्थिक गुन्हे शाखेच्या चौकशीत कोणते निष्कर्ष निघतात, याकडे संपूर्ण तुमसर तालुक्याचे लक्ष लागले आहे.




## संपादकीय

### विदर्भात विधानपरिषदेत महायुतीचीच आघाडी

महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीसाठी स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील १७ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. सत्ताधारी महायुतीने संघटनात्मक ताकद आणि स्थानिक पातळीवरील संख्याबळाच्या जोरावर आघाडी घेतल्याचे चित्र आहे. त्यामुळे विदर्भातील बहुतांश मतदारसंघांमध्ये महायुतीचे उमेदवार सरस ठरण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रात सध्या विधान परिषदेसाठी स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून निवडून द्यायच्या १७ उमेदवारांसाठी निवडणुका जाहीर झाल्या आहेत. त्यात विदर्भातील पाच जागा आहेत. या पाच जागांमध्ये नागपूर मतदारसंघ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली मतदारसंघ, अमरावती मतदारसंघ, यवतमाळ मतदारसंघ, आणि भंडारा, गोंदिया मतदारसंघ अशा पाच मतदारसंघांतून आमदार निवडायचे आहेत.या पाच जागांपैकी वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ या दोन मतदारसंघांमध्ये उमेदवारी अर्ज मागे घ्यायच्या दिवशी महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी आणि इतर उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतल्यामुळे दोन्ही ठिकाणी महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यात यवतमाळमध्ये शिवसेनेचे दुष्यंत चतुर्वेदी हे दुसऱ्यांदा या मतदारसंघातून विजयी झाले आहेत, तर वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली मतदारसंघातून भाजपचे अरुण लखानी हे बिनविरोध विजयी झाले आहेत. त्यामुळे आता नागपूर, भंडारा, गोंदिया आणि अमरावती या तीन मतदारसंघांमध्ये लढत होत असून १८ जून रोजी मतदान होऊन इथल्या उमेदवारांचे भवितव्य पेटीबंद होणार आहे. बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये अरुण लखानी हे उद्योगपती असून संघ परिवाराशी संबंधित आहेत. त्याचप्रमाणे नितीन गडकरी यांचे निकटवर्ती आहेत. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांची नात आणि सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवती ही लवकरच अरुण लखानी यांची सून होणार आहे. दुष्यंत चतुर्वेदी हे काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री सतीश चतुर्वेदी यांचे सुपुत्र असून ते मात्र राजकारणात आल्यापासून शिवसेनेतच राहिलेले आहेत. त्यांची निवडून येण्याची ही दुसरी टर्म आहे.यातील निवडणुकांमध्ये सध्या अमरावती मतदारसंघातील निवडणूक चांगलीच गाजते आहे. ती गाजण्याचे कारण म्हणजे काँग्रेसमधील अंतर्गत दुफळी हेच म्हणता येईल. मात्र झाल्या प्रकारात आता भाजपवर आरोप करणे सुरू झाले आहे. इथे भाजपचे विद्यमान आमदार प्रवीण पोटे पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्याविरोधात काँग्रेसचे हर्षदीप देशमुख यांना उमेदवारी दिली आहे. हर्षदीप देशमुख हे मुळात नागपूरचे आहेत. त्यामुळे अमरावतीच्या काँग्रेसजनांचा विरोध आहे. त्यातच तीन दिवसांपूर्वी देशमुख यांची अचानक प्रकृती बिघडली आणि त्यांना नागपूरच्या खासगी रुग्णालयात ॲडमिट करण्यात आले आहे. त्यावरून आता मोठे वादंग उठले आहे. काँग्रेसच्या स्थानिक नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी हर्षदीप देशमुख यांच्यावर भाजपकडून २० कोटी रुपये घेऊन ‍मॅनेज झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. नागपूरमधील रुग्णालयातून माध्यमांशी संवाद साधलेल्या हर्षदीप देशमुख यांच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. प्रकृती इतकी गंभीर असताना माध्यमांना प्रतिक्रिया कशी देता आली, असा सवाल यशोमती ठाकूर यांनी केला. दरम्यान, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. सुनील देशमुख यांनीही हर्षदीप देशमुख यांच्या रुग्णालयात दाखल होण्याबाबत नाराजी व्यक्त करत, हॉस्पिटलमधून बोलण्याऐवजी मैदानात उतरून लढावे, असे आव्हान दिले आहे. या घडामोडींमुळे स्थानिक काँग्रेस नेते हर्षदीप देशमुख यांना पाठिंबा देण्याबाबत साशंक असल्याचे सांगितले जात असून, काही नेते वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार नीलेश विश्वकर्मा यांना पाठिंबा देण्याच्या विचारात असल्याची माहिती समोर येत आहे.तसेही स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात भाजपचेच वर्चस्व राहिलेले आहे. त्यामुळे ही निवडणूक एकतर्फीच होईल असे बोलले जात आहे. प्रवीण पोटे हे यापूर्वीही दोनदा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातूनच विधान परिषदेवर सदस्य म्हणून गेलेले आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मंत्रिमंडळात काही काळाचे मंत्री देखील राहिलेले आहेत. त्यांच्या आधी भाजपचे जगदीश गुप्ता हे देखील या मतदारसंघातून विजयी झाले होते. त्यामुळे त्यांचा या भागात संपर्क दांडगा आहे. नागपूर मतदारसंघात यावेळी महायुतीतर्फे भाजपचे डॉ. राजीव पोतदार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राजीव पोतदार हे या भागातील भाजपचे जुने कार्यकर्ते आहेत. नागपूर जिल्हा भाजपचे हे काही काळ अध्यक्षही राहिलेले आहेत. त्यांच्या आधी या मतदारसंघातून भाजपचे चंद्रशेखर बावनकुळे, त्याआधी भाजपचेच गिरीश व्यास हे विजयी झाले होते. सध्या नागपूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपची ताकद लक्षणीय अशीच राहिलेली आहे. अशातच काँग्रेस पक्ष हा नागपूर जिल्ह्यात अतिशय विस्कळीत अवस्थेत आहे. जरी नागपूर ग्रामीणमध्ये रामटेक लोकसभा क्षेत्रात काँग्रेसचे नरेश बर्वे हे खासदार असले तरी विधानसभा क्षेत्रात त्यांची फारशी ताकद राहिलेली नाही. उमरेडमध्ये काँग्रेसचे संजय मेश्राम वगळता बाकी इतर सर्व आमदार महायुतीचे आहेत. शिवाय नागपूर जिल्ह्यात भाजपचे देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी आणि चंद्रशेखर बावनकुळे असे तीन दिग्गज नेते सक्रिय आहेत. त्यामुळे पोतदारांची जागा निश्चित निघेल असे बोलले जात आहे. काँग्रेसतर्फे त्यांच्या विरोधात अतुल लोंढे उभे आहेत. अतुल लोंढे हे विद्यमान प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि त्या आधीचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे निकटवर्ती राहिलेले आहेत.त्यामुळेच त्यांना ही उमेदवारी देण्यात आली आहे. काँग्रेसमध्ये येण्यापूर्वी ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सक्रिय होते त्यामुळे स्थानिक काँग्रेस नेते आणि लोंढे यांचे फारसे सख्य नाही. त्या तुलनेत डॉ. पोद्दार हे कायम जिल्ह्यातच असतात. त्यामुळे पोतदारांचा विजय निश्चित मानला जात आहे. नागपूर जिल्हा हा एके काळी काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जात होता. १९७७ मध्ये महाराष्ट्रात सत्तांतर झाले. शंकरराव चव्हाण यांचे मंत्रिमंडळ जाऊन वसंतदादा पाटील यांचे मंत्रिमंडळ आले. त्यावेळी पुसदचे सुधाकरराव नाईक यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले होते. मात्र ते कुठलेही आमदार नव्हते. त्यामुळे त्यांना नागपूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडून आले होते. त्यानंतरही दीर्घकाळ हा मतदारसंघ काँग्रेसकडेच राहिला होता. २००३ मध्ये नितीन गडकरींनी आपली चाणक्यनीती वापरून हा मतदारसंघ भाजपकडे खेचला. भंडारा, गोंदिया स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून भाजपचे अविनाश ब्राह्मणकर हे रिंगणात उतरले आहेत. इथे देखील महाविकास आघाडीच्या उमेदवाराने माघार घेतलेली असल्यामुळे ही निवडणूक एकतर्फीच होईल असे बोलले जात आहे. काँग्रेसच्या काळात देखील इथून भाजपचे लक्ष्मणराव मानकर, महादेव शिवणकर, हेमकृष्ण कापगते अशी सर्व मंडळी निवडून येत होती. मात्र मधल्या काळात राष्ट्रवादीचे प्रफुल्ल पटेल आणि काँग्रेसचे नाना पटोले यांनी या भागात आपले वर्चस्व वाढवले होते. अर्थात यावेळी प्रफुल्ल पटेल हे महायुती सोबतच आहेत. त्यामुळेच की काय २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत इथे काँग्रेसचे एकटे नाना पटोले वगळता मविआचे कोणीही निवडून आले नव्हते. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून यापूर्वी भाजपचेच परिणय फुके हे निवडून येत होते. आता यावेळी अविनाश ब्राह्मणकर यांना संधी मिळाली आहे. इथे देखील महाविकास आघाडीच्या उमेदवाराने माघार घेतली असल्यामुळे नरेश ईश्वरकर आणि सचिन कुंभलकर या दोन अपक्षाशी त्यांची लढत होणार आहे.

विदर्भातील चित्र पाहता चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली आणि यवतमाळ या दोन्ही मतदारसंघात महायुतीने आपले उमेदवार बिनविरोध निवडून आणून आपले खाते उघडले आहे. आता उर्वरित तीन जागी देखील महायुतीचेच उमेदवार विजयी होतील असे चित्र दिसत आहे. अर्थात मतदार फोडले जाणे, त्यांनी क्रॉस्फोटिंग करणे असे प्रकार होऊ शकतात. त्यामुळे बहुतेक सर्व ठिकाणी आधीच सर्वच पक्षांनी आपापल्या मतदारांना वेगवेगळ्या ठिकाणी पर्यटनासाठी नेऊन ठेवलेले आहे. या सर्वांना १८ जूनलाच परत आणले जाईल आणि त्यानंतर मतदान होऊन सर्वांचे भाग्य पेटीबंद केले जाईल. अर्थात त्याचा निकाल यायला आपल्याला २२ जूनपर्यंत थांबावे लागणार आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# आता लोकांचीच लढाई निर्णायक!

नुकताच तामिळनाडू, केरलम, पद्दुचेरी,प.बंगाल आणि आसाम या पाच राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला. एकंदरीत निकाल संमिश्र लागला असला तरी तद्नंतर लोकशाहीच्या अस्तित्वासंबंधी, विशेषतः प. बंगाल व आसाम संदर्भात साधार भितीयुक्त चर्चेचे पेव फुटले. प. बंगाल राज्यातील निवडणुकीत ज्याप्रकारे सत्तांतर घडवून आणले गेले त्याविषयी अधिक उद्विग्नता दिसून येत आहे. त्यामुळे सर्वाधिक चर्चेत प. बंगाल राज्यातील निवडणूक राहिलेली आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर तृणमूल काँग्रेस आणि काही विरोधी नेत्यांनी निवडणूक प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. त्यावरून आता लोकांनीच लोकशाहीच्या बचावासाठी पुढे येण्याची अपरिहार्यता आलेली दिसते. मुख्यत: ममतांची चोरीफ (चोरलेला जनादेश) चा आरोप. ममता बॅनर्जी यांनी भाजपचा विजय “अनैतिक आणि बेकायदेशीर” असल्याचे सांगत, याला ममतांची चोरीफ म्हटले आहे. त्यांनी आरोप केला की, मतमोजणीच्या शेवटच्या फेऱ्यांमध्ये त्यांच्या प्रतिनिधींना मोजणी कक्षातून बाहेर काढण्यात आले आणि मतदान यंत्रामध्ये फेरफार करण्यात आली. बॅनर्जी यांनी भारत निवडणूक आयोग (ECI) आणि केंद्रीय राखीव पोलीस दल CRPF वर भाजपच्या सांगण्यावरून काम केल्याचा आणि गुंडांच्या मदतीने तृणमूलच्या प्रतिनिधींना धमकावल्याचा आरोप केला आहे. निकालानुसार, भाजपने सर्वाधिक जागा जिंकून पश्चिम बंगालमध्ये सत्ता मिळवली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही या निकालांना “नैसर्गिक” नसल्याचे म्हटले असून, लोकशाही संस्थांच्या खच्चीकरणाचा आरोप केला आहे.या आरोप-प्रत्यारोपांमुळे पश्चिम बंगालच्या राजकारणात मतमोजणीच्या पारदर्शकतेवर मोठी चर्चा सुरू झाली आहे.

पश्चिम बंगालमध्ये विशेष गहन पुनरीक्षण (Secial Intensive Revision - SIR) प्रक्रियेनंतर मतदार यादीतून मोठ्या प्रमाणावर नावे वगळण्यात आली आहेत. मे २०२६ पर्यंतच्या ताज्या माहितीनुसार, निवडणूक आयोगाने यादीतून तब्बल ९० ते ९१ लाख (सुमारे ९ दशलक्ष) मतदारांची नावे वगळली आहेत. या प्रक्रियेमुळे राज्याचा एकूण मतदार आधार सुमारे १२% ने कमी झाला आहे. मतदारांची संख्या ७.६६ कोटींवरून ७.०४ कोटी इतकी झाली आहे.

अंतिम सुधारणेवेळी सुमारे ६३ लाख नावे काढण्यात आली. त्यानंतर अधिक पडताळणी (Adjudication) झाल्यावर आणखी २७ लाख नावे वगळण्यात आली. वगैरे आकडेवारी विविध माध्यम स्रोतातून येऊ लागली. ही कारवाई बोगस, दुबार, स्थलांतरित किंवा मृत मतदारांची नावे काढून मतदार यादी स्वच्छ करण्यासाठी करण्यात आली असल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.अर्थात, निवडणूक आयोगाने दिलेल्या स्पष्टीकरणाने आकडेवारीला पुष्टी मिळते. या मडखठफ प्रक्रियेचा प्रभाव २०२६ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालांवर मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येत आहे.

आसाममध्येदेखील मतदारसंघ डिलिमीटेशन प्रक्रियेत सत्ताधारी पक्षाला अनुकूल कार्य पार पाडल्या गेले आणि त्यामुळे आसाम विधानसभा निवडणुकीचा निकाल अनपेक्षित लागल्याचे बोलले जाते.

या निवडणुकीत निवडणूक आयोगाच्या कार्यशैलीवर होत असलेले आरोप निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबद्दल संशय, निवडणुकीतील केंद्रीयसत्तेचा हस्तक्षेप ही चिंतेची बाब सर्वसामान्य लोकांपेक्षा संवेदनशील आणि गंभीर नागरीकांना अधिक सतावत आहे. त्यातही मतचोरीचा प्रकार अधिक गंभीर आहे. पराभूत पक्षांनी पराभवानंतर आरोप प्रत्यारोप करणे ही काही नवी बाब नाही, परंतु निवडणूक आयोग आणि इतर केंद्रीय संस्थांचा सत्तेच्या दबावाखाली वर्तन आणि प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेपासून मतदारांना वंचित ठेवणे निश्चितच गंभीर चिंतेची बाब ठरते. मताधिकार हा केवळ निवडणुकीत मत देण्याइतका मर्यादित नसून मानवाधिकाराच्या कक्षेत महत्त्वपूर्ण अधिकार आहे. त्यामुळे मताधिकारावर आलेला घाला मानवाधिकाराचे उल्लंघन समजले जाते.

दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना झाली आणि १९४८ मध्ये जागतिक मानवाधिकार घोषणापत्राने मतदानाचा हक्क मूलभूत अधिकार म्हणून घोषित केला.अनेक देशांनी समान सार्वत्रिक आणि भेदभाव रहित मताधिकाराचे तत्व स्वीकारले. भारतात २६ जानेवारी १९५० साली भारताचे संविधान लागू करताना, संपत्ती जात भाषा प्रदेश धर्म लिंग इत्यादी भेद न करता सार्वत्रिक प्रौढ मताधिकार प्रदान करण्यात आला. मताधिकार केवळ निवडणुकीकरता मर्यादित नसून तो नागरिकांच्या सक्रिय सहभागाचे स्वातंत्र्याचे समानतेचे आणि सामाजिक संधीचे प्रतीक बनले. मताधिकाराचा मानवी अधिकाराशी संबंध आहे.मानवी प्रतिष्ठा, स्वातंत्र्य आणि समानता ही मूल्ये मताधिकाराशिवाय पूर्ण होत नाही.मताधिकार व्यक्तीच्या राजकीय अस्तित्वाची ओळख करून देते. मताधिकार राज्यसत्तेवर नियंत्रण ठेवणारा मानवी अधिकार असून मतदारांना राष्ट्रीय भागीदार बनवतो.मताधिकार समाजातील दलित, आदिवासी, मागासवर्ग, अल्पसंख्याक, तरुण, वृद्ध, महिला यांना सत्तेत सहभाग देतो. मताधिकाराचा इतिहास आपल्याला सांगतो की मताधिकार हा मानवी अधिकार आणि लोकशाहीच्या परिपक्वतेचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

लोकशाही व्यवस्थेत मताधिकार हा खरंतर लोकशाहीचा प्राण मानला गेलेला आहे. भारतात संविधानाच्या चौकटीत मताधिकाराला संरक्षण मिळते. इतर प्रगत देशाच्या इतिहासात मताधिकार दीर्घ संघर्षाच्या प्रक्रियेतून सार्वत्रिक मताधिकार इथपर्यंत प्रवास पहायला मिळतो.भारतात मात्र लोकशाहीवादी स्वातंत्र्य प्रेमी नेत्यांनी मतदारांची अर्हता सरल केली. संपत्ती अथवा राजेशाही, संस्थानिक इ. चा वारस या निकषांना तिलांजली देऊन भारतातल्या २१ वर्षे वयाच्या सकल स्त्रीपुरुष लोकांना मताधिकार बहाल केले.

भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मतदार कोणाला म्हणायचे हे निश्चित झाले. मतदाराची अर्हता निश्चित करत असताना वय वर्षे १८ (१९८८ पूर्वी २१ वर्षे ) वगळता, जात- धर्म- पंथ- वर्ग- लिंग- भूप्रदेश असा कुठल्याही भेदभावाचा लवलेश नाही. विश्वातील सर्वाधिक मतदार असलेला भारत देश याद्वारे मताधिकाराने निवडणूकीतून लोकशाही जिवंत राखत आलेला आहे. मतदानाचा हक्क प्राप्त होण्याचा शेकडो वर्षांचा जागतिक इतिहास अतिशय संघर्षपूर्ण असा आहे. अमेरिका आणि युरोप मधील अनेक प्रगत देशांमध्ये मताधिकारासाठी स्त्रियांना आणि सर्वसामान्य लोकांना झगडावे लागले.भारतात मात्र मतदानाचा हक्क घटनात्मक आहे. घटनाकारांनी एक मत समान पत या तत्वाधारे मताधिकार भारतीय जनतेला बहाल केला. त्याची पायमल्ली होत असेल तर लोकांनी गंभीर होणे गरजेचे नाही का? आजपर्यंत सातत्याने मतदार याद्यांचे पुनरिक्षण प्रक्रियेद्वारे अद्ययावतीकरण होत आलेले आहे पण त्यातील पारदर्शी भूमिका आणि निवडणूक यंत्रणा याबद्दल साशंक मत राहिलेले दिसत नाही. सद्यस्थितीत मात्र मतदारांची नावे वगळून लोकशाहीचा गळा घोटण्याचे अभूतपूर्व होत असलेले आरोप अतिशय गंभीर आहेत.

मतदानाच्या अधिकारांपासून वंचित असलेले लाखो मतदार आहेत. ते गप्प जरी नसले तरी त्यांचा आवाज क्षीण आहे. काही जागृत मतदार दाद मागत न्यायालयात पोहचले. वैधानिक लढाई लढत आहेत. तर काही राजकीय पक्षदेखील लोकांना मताधिकार पूर्ववत मिळावे यासाठी लढत आहेत. पण शासकीय यंत्रणा निवडणूक आयोग,न्यायालय, प्रसारयंत्रणा यांच्यातील अभूतपूर्व जुगलबंदी ही लढाई किती यशस्वी होऊ देईल? या जुगलबंदीस भेदून लोकशाहीच्या बचावासाठी लोकांची ही लढाई लढणाऱ्या राजकीय सामाजिक लोकशाहीवादी शक्तींना बळ देत लोकांनी लढण्याशिवाय गत्यंतर नाही.

**अनुज हुलके?**

## गेल्या वर्षी पावसाचे १३ बळी; यंदा सावध राहण्याचा इशारा

**गोंदिया :-** मृग नक्षत्र ८ जूनपासून लागले असून, पावसाळ्याला सुरुवात झाली आहे. पावसाळा सुरू झाला असला तरी अद्याप पावसाने दमदार हजेरी लावलेली नाही. मात्र, नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. कारण, मागील वर्षी सन २०२४-२५ मध्ये १३ जणांना पूर, वीज व अंगावर झाड, भिंत पडून जिवाला मुकावे लागले आहे. यामुळेच पावसाळ्यात खबरदारी घेणे गरजेचे झाले असून, वादळी वारा व पावसात बाहेर पडणे टाळा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.



यंदा पावसाचे प्रमाण मएल निनोफमुळे कमी राहणार, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. तो काही प्रमाणात खरा ठरत असल्याची चिन्हे दिसून येत आहेत. कारण, मृग नक्षत्र लागूनही पावसाने दमदार हजेरी लावलेली नाही, वादळ वारा सुटत असला तरी पाहिजे तशी पावसाची एन्ट्री झालेली नाही. मात्र, हा वादळ वारा व पूरपरिस्थिती जीवघेणी ठरते, यात शंका नाही. हेच कारण आहे की, जिल्ह्यात सन २०२४-२५ मध्ये तब्बल १३ जणांचा जीव गेला आहे. यामध्ये पुरात वाहून गेल्याने सहा जण, वीज पडून पाच जण तर अंगावर झाड, भिंत पडून दोन जण ठार झाले आहेत. हेच कारण आहे की, जिल्हा प्रशासनाकडून अशा घटना बघता जिल्हावासीयांना वादळ वारा, विजांचा कडकडाट तसेच नदी-नाल्याला पाणी आल्यास खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**पूर व वीज पडून ५६ पशुंचा बळी**

मागील वर्षी जिल्ह्यात पुरपूर प्रमाणात पाऊस झाला असून, जिल्ह्याला पूरपरिस्थितीचा सामनाही करावा लागला होता. त्यातही ग्रामीण भागात या पुरामुळे जास्त प्रमाणात नुकसान होत असून, पुरात वाहून ३० पशुचा तर वीज पडून २६ पशुंचा जीव गेला होता. यामुळे पावसाळ्यात पशुंची योग्य ती व्यवस्था करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**वीज पडून मृत्यूचे प्रमाण जास्त**

जिल्ह्याला पावसाळ्यात पूर आणि वीज पडणे या दोन्ही धोक्यांचा सामना करावा लागत असून, त्यात वीज पडून मृत्यूचे प्रमाण जास्त दिसून येते. सन २०२३-२४ मध्ये वीज पडून पाच व्यक्ती व २२ पशु तर सन २०२४-२५ मध्ये पाच व्यक्ती व २६ पशुंचा जीव गेला आहे. अशात विजा चमकत असल्यास सुरक्षितस्थळी आसरा घ्या, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## मुख्याध्यापिका अजया चुटे यांची सेवेतून हकालपट्टी!

**सालेकसा :-** तालुक्यातील साखरी टोला (सातगाव) येथील श्री विद्या गर्ल्स हायस्कुलच्या मुख्याध्यापिका श्रीमती अजया जागेश्वर चुटे यांच्यावर अखेर व्यवस्थापनाने बडतर्फीची मोठी कारवाई केली आहे. त्यांच्यावर लावण्यात आलेले गंभीर आरोप चौकशी समितीसमोर सिद्ध झाल्याने, संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाने त्यांना सेवेतून थेट बडतर्फ (सेवामुक्त) केले आहे. या धक्कादायक कारवाईमुळे गोंदिया जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

संस्थेकडून मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, श्रीमती अजया चुटे यांच्याविरुद्ध प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने ‍महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१फ मधील नियम क्र. ३६ व ३७ अन्वये एक विशेष चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.

या समितीने संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून आपला अंतिम अहवाल व्यवस्थापनाकडे सादर केला होता. समितीने अहवालात मुख्याध्यापिकेवर असलेले गंभीर आरोप सिद्ध झाल्याचे नमूद करत शिक्षेची शिफारस केली होती. हा अहवाल आणि शिफारस व्यवस्थापनाने सर्वसंमतीने स्वीकारली असून त्यानुसार पारीत ठरावा अन्वये ही कठोर कारवाई करण्यात आली.

पारीत झालेल्या अंतिम निर्णयानुसार, श्री विद्या गर्ल्स हायस्कुल, सातगाव (साखरी टोला), ता. सालेकसा, जि. गोंदिया या शाळेच्या सेवेतून श्रीमती अजया जागेश्वर चुटे यांना दि. १५ जून २०२६ (माध्यान्हपूर्व) पासून अधिकृतपणे सेवामुक्त करण्यात आले आहे. १५ जून रोजी दुपारी १२ वाजेच्या आधीपासूनच त्यांचे मुख्याध्यापिका पद आणि सेवेतील सर्व अधिकार संपुष्टात आले आहेत.

या संवेदनशील आणि मोठ्या प्रशासकीय कारवाईची अधिकृत प्रत (प्रतिलिपी) पुढील योग्य त्या प्रशासकीय कार्यवाहीसाठी माननीय शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद गोंदिया तसेच माननीय अधीक्षक, भविष्य निर्वाह निधी पथक, गोंदिया यांना तात्काळ रवाना करण्यात आली आहे. एका विद्यालयाच्या मुख्याध्यापिकेवरच गंभीर आरोप सिद्ध होऊन थेट हकालपट्टी झाल्याने, सध्या हाच विषय संपूर्ण जिल्हाभरात चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

### बीडी कामगारांच्या मुला-मुलींना मिळणार शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याचे आवाहन

**गोंदिया :** १ जून २०२६ पासून गोंदिया जिल्ह्यातील बीडी कामगार तसेच इतर श्रम क्षेत्रात कार्यरत कामगारांच्या पाल्यांना राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शैक्षणिक, आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. सदर योजनेची ऑनलाईन अर्ज प्रक्रिया दि.१ जून २०२६ पासून सुरु झालेली आहे. या योजनेअंतर्गत इयत्ता पहिली पासून ते व्यवसायिक अभ्यासक्रमांपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.लाभार्थ्यांना दरवर्षी १ हजार ते २५ हजार रुपये या मर्यादित आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येईल. यासाठी इच्छुक विद्यार्थी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल द्वारे ऑनलाईन अर्ज करु शकतात. प्री मॅट्रिक विद्यार्थ्यांसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१ ऑगस्ट २०२६ आहे व पोस्ट मॅट्रिक विद्यार्थ्यांसाठी अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर २०२६ निर्धारित केलेली आहे.

## शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करा;राकाँ (शप) गटाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**गोंदिया :-** महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीमध्ये घालण्यात आलेल्या जाचक अटी रद्द करून शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा दर्शवित राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) गोंदिया जिल्ह्याच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे निवेदन सादर करण्यात आले.

माजी खासदार खुशालचंद्र बोपचे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन शासनाने शेतकरीविरोधी जाचक अटी तात्काळ रद्द कराव्यात व सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महिला जिल्हाध्यक्ष सौ. मेघाताई बिसेन, जिल्हा सरचिटणीस अजित नायर, जिल्हा सरचिटणीस नासिर घाणीवाला, युवक जिल्हाध्यक्ष गणेश पारधी, महिला तालुका अध्यक्ष सौ. मंदाताई टेंभरे, व्ही. टी. पटले सर, माजी सरपंच प्रकाश पटले यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी बांधव उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) सातत्याने संघर्ष करत असून शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहील, अशी भूमिका यावेळी पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

# ओबीसी प्रवर्गाला एक आदरयुक्त आवाहन

लढा ओबीसींचा

आपला धर्म, श्रद्धा, संस्कृती आणि परंपरा या आपल्या वैयक्तिक आयुष्याचा महत्त्वाचा भाग आहे त्या आपण आपल्या घरात, समाजात आणि उपासनेच्या ठिकाणी जपल्या पाहिजेत परंतु आपल्या हक्कांचे, अधिकारांचे, सामाजिक न्यायाचे, समतेचे आणि प्रतिनिधित्वाचे कायदेशीर संरक्षण भारतीय संविधान करते, हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. कुठल्याही राजकीय पक्षाच्या सांगण्यावरून या दोन्ही गोष्टींचे मिश्रण करू नका आणि भावनात्मक होऊन गोंधळ घालून घेऊ नका.

लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही सत्ताधारी पक्षाची किंवा सरकारची जबाबदारी ही संविधानिक असते कारण शासनातील सर्व पदे, अधिकार आणि संस्था संविधानातून निर्माण झालेले आहेत. त्यामुळे नागरिक म्हणून संविधानिक मूल्यांचे रक्षण करणे आणि आपल्या अधिकारां विषयी जागरूक राहणे हे आपले प्राथमिक कर्तव्य आहे.

धर्म म्हणजे मानवी जीवनाला दिशा देणारा, नैतिक मूल्ये रुजवणारा आणि समाजात सुव्यवस्था निर्माण करणारा घटक. समाजाचे, व्यक्तीचे आणि विश्वाचे कल्याण व सुव्यवस्था टिकवून ठेवणारी आचारसंहिता, मूल्ये, कर्तव्ये आणि तत्त्वे यांना धर्म म्हणतात. हाच खऱ्या अर्थाने मानवधर्म आहे.

अंधश्रद्धा, रूढी-परंपरांच्या नावाखाली होणारे अन्याय, जातीय भेदभाव, सामाजिक विषमता किंवा एखाद्या समूहाचे शोषण यांना धर्म म्हणता येत नाही. कारण धर्माचा उद्देश माणसाला उन्नत करणे, समाजात न्याय निर्माण करणे आणि सर्वांच्या कल्याणासाठी कार्य करणे हा असतो. एखाद्या व्यक्तीला किंवा समूहाला कनिष्ठ मानने, त्यांचे शोषण करणे किंवा त्यांना समान संधींपासून वंचित ठेवणे हे धर्माच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात आहे.

समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांना आधार देणे त्यांना सन्मान मिळवून देणे हे धर्माचे मूळ आहे. स्त्री-पुरुष समानता, मानवी प्रतिष्ठा, सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि करुणा ही मूल्ये धर्माच्या केंद्रस्थानी असली पाहिजेत. जो विचार सर्वांना समान सन्मान देतो, अन्यायाविरुद्ध उभा राहतो आणि मानवकल्याणासाठी कार्य करतो, तोच खरा धर्म आणि तोच मानवधर्म आहे.

आज ओबीसी समाजासमोर शिक्षण, रोजगार, आरक्षण, राजकीय प्रतिनिधित्व, सामाजिक न्याय आणि आर्थिक प्रगती यांसारखे अनेक महत्त्वाचे प्रश्न उभे आहेत.. लोकशाहीत नागरिकांनी प्रश्न विचारणे, उत्तरदायित्वाची मागणी करणे आणि जनहिताला प्राधान्य देणे हेच खऱ्या स्वातंत्र्याचे लक्षण आहे.

सत्ता बदलत राहते, सरकारे येतात आणि जातात; परंतु संविधानिक हक्क, लोकशाही संस्था आणि सामाजिक न्यायाची तत्त्वे कमकुवत झाली तर त्याचा परिणाम अनेक पिढ्यांवर होऊ शकतो. लोकशाहीचे रूपांतर हुकूमशाहीत होऊ नये यासाठी नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. म्हणून व्यक्तिपूजा, पक्षनिष्ठा किंवा आंधळ्या समर्थनापेक्षा संविधान, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे.धर्माच्या नावाखाली कोणत्याही राजकीय पक्षाच्या हातची बाहुली बनणे हा अधर्म आहे.

आपण या देशाच्या लोकसंख्येतील मोठा घटक आहोत. त्यामुळे आपली एकता, जागरूकता आणि संघटनशक्ती हीच आपली खरी ताकद आहे. ओबीसी समाजाने एकत्र येऊन हक्क, अधिकार आणि सामाजिक न्यायासाठी आवाज उठवला तर परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता त्याच्यात आहे.कुठल्याही नेतृत्वावर अवलंबून राहण्यापेक्षा समाजाने स्वतःचे सामूहिक नेतृत्व उभे केले पाहिजे. बेरोजगार ओबीसी तरुणांची परिस्थिती अतिशय बिकट आहे त्यांनी ही धुरा सांभाळण्याची गरज आहे.जातीपातीचे राजकारण सोडा आणि ओबीसी म्हणून एकत्रित या.

अनेक वेळा नेतृत्वाची आश्वासने देऊन किंवा पदांची प्रलोभने दाखवून ओबीसी समाजाचा राजकीय वापर करण्यात आला; परंतु समाजाचे मूलभूत प्रश्न मात्र कायम राहिले. त्यामुळे प्रत्येक ओबीसी बांधवाने जिथे असेल तिथूनच कुणाचीही वाट न बघता ओबीसींची स्वतंत्र कॉलमसहित जातनिहाय जनगणना आणि संविधानिक हक्कांसाठी लढा दिला पाहिजे.. स्वतंत्र व पारदर्शक माहितीच्या आधारेच धोरणे तयार होऊ शकतात आणि न्याय्य प्रतिनिधित्व सुनिश्चित होऊ शकते.

ओबीसी म्हणजे ‍इतर‍ नव्हे, तर या देशाच्या विकासात आणि उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावणारा “सर्वत्र” आहे. म्हणून स्वतःच्या अस्मितेची, अधिकारांची आणि योगदानाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

आपल्या हक्क-अधिकारा सोबत भावनिक गफलत करून घेऊ नका. कारण या देशात या गफलती मुळे सर्वात जास्त जर कुठल्या समूहाचे नुकसान झाले असेल तर तो ओबीसी समूह आहे. दोघांचीही आपापल्या ठिकाणी स्वतंत्र व्याख्या व महत्त्व आहे. कुठलेही राजकीय मुद्दे जोर धरत असले कुठलीही परिस्थिती असली कितीही आपल्याला भटकविण्याचा प्रयत्न झाला तरी ओबीसी प्रवर्गाने आपला हट्ट मात्र सोडायचा नाही. आपली जातनिहाय जनगणना स्वतंत्र रकान्यासहीत झालीच पाहिजे.. छत्रपतीशिवाजी महाराज,महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा मार्ग स्वीकारून, संविधानिक हक्क, सामाजिक न्याय, मानवी समानता आणि मानवधर्माच्या मूल्यांसाठी सजग नागरिक म्हणून उभे राहूया. हाच समाजाच्या प्रगतीचा, स्वाभिमानाचा आणि खऱ्या लोकशाहीचा मार्ग आहे.

**ॲड. समीक्षा गणेशे (सराटकर)**

# माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत "स्टॉप डायरिया' मोहीम : ८२ हजारांहून अधिक बालकांना मिळणार सुरक्षा कवच- जिल्हाधिकारी डॉ.मंगेश गोंदावले

## १६ जून ते ३१ जुलै कालावधीत विशेष मोहीम




**गोंदिया :-** बालकांमधील अतिसाराचे प्रमाण रोखण्यासाठी आणि बालमृत्यू दरात घट करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात दि.१६ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत मस्टॉप डायरियाफ (Intensified Diarrhea Control F$ortnight) विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील एकूण ८२,८२४ बालकांना ओआरएस (जठड) आणि झिंकच्या गोळ्यांचे वाटप केले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. मंगेश गोंदावले यांनी दिली आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमध्ये सध्या ९१,८५८ ओआरएस पाकिटे, झिंकच्या गोळ्या १,६०,८०० आणि ३,८८७ झिंक सिरपची उपलब्धता करून देण्यात आली आहे. आशा सेविका यांच्या मार्फत प्रत्येक घरोघरी जाऊन ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांची तपासणी केली जाईल व आवश्यकतेनुसार औषधोपचार पुरविला जाईल.

**मोहिमेची ठळक वैशिष्ट्ये आणि नियोजन**

आशा सेविकांचे मोठे योगदान : जिल्ह्यातील १,२९२ कार्यरत आशा स्वयंसेविकांच्या मदतीने ही मोहीम प्रत्यक्ष गावपातळीवर राबवली जाणार आहे. या मोहिमेदरम्यान ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांची तपासणी प्रत्यक्ष हात धुण्याचे प्रशिक्षण व जनजागृती करण्यात येणार आहे.

शाळा व अंगणवाड्यांचे सर्वेक्षण : मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील १,८७८ अंगणवाड्या आणि १,१६५ जिल्हा परिषद शाळांमधील बालकांचे सविस्तर सर्वेक्षण करून आरोग्य तपासणी केली जाणार आहे.

कुटुंबापर्यंत पोहचणार आरोग्य यंत्रणा : एकूण १३,२९,०५३ लोकसंख्येच्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या ६६,४३८ कुटुंबांपर्यंत आशा सेविका आणि आरोग्य यंत्रणा या मोहिमेच्या माध्यमातून पोहोचणार आहे.

**जिल्हा आरोग्य प्रशासनाचे आवाहन**

आरोग्य प्रशासनातर्फे सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अरविंदकुमार वाघमारे आणि जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.रोशन राऊत यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना, विशेषतः पालकांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपल्या ० ते ५ वर्षांपर्यंतच्या बालकांची आरोग्य तपासणी करून घ्यावी. पावसाळ्याच्या दिवसांत बालकांमध्ये अतिसाराचा (डायरिया) धोका वाढतो, त्यामुळे आशा सेविका आपल्या घरी आल्यास त्यांना योग्य माहिती देऊन सहकार्य करावे.

# आरटीआय अर्जाकडे दोन महिन्यांपासून दुर्लक्ष; तुमसर नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांविरोधात कारवाईची मागणी

**तुमसर:-**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मुदतीत माहिती देणे बंधनकारक असतानाही, तुमसर नगर परिषदेच्या संबंधित विभागाने गेल्या दोन महिन्यांपासून अर्जदाराला माहिती न दिल्याने कायद्याचे उघड उल्लंघन होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अर्जदार नरेंद्र प्रभाकरराव वाडीभस्मे (रा. खापा, ता. तुमसर) यांनी केली आहे.

अर्जदार नरेंद्र वाडीभस्मे यांनी २० एप्रिल २०२६ रोजी तुमसर नगर परिषदेच्या लेखा विभागातील जन माहिती अधिकाऱ्यांकडे एक आरटीआय अर्ज दाखल केला होता. या अर्जाद्वारे त्यांनी मनगर परिषद तुमसर सार्वत्रिक निवडणुका-२०२५फ मधील निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन लोढे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार संजय जांभूळकर आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी करणकुमार चव्हाण यांना काढण्यात आलेल्या अतिकालीक भत्त्याबाबत सविस्तर माहिती मागितली होती.

**अर्जात प्रामुख्याने सत्यप्रत मागण्यात आली होती:**

अधिकाऱ्यांच्या अतिकालीक भत्ता मंजुरीचे आदेश आणि कार्यालयात सादर झालेल्या देयकांच्या आवक-जावक नोंदवहीची सत्यप्रत. संबंधित भत्त्याची रक्कम धनादेश,




आरटीजीएस किंवा रोखीने दिली असल्यास त्याची रोकडवही व बँक पासबुकची साक्षांकित प्रत. सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी किती निधीची तरतूद केली होती, तसेच मंजुरीसाठी मासिक/पाक्षिक किंवा विशेष सभेत घेतलेल्या ठरावांची प्रत आणि निवडणूक खात्याच्या बँक पासबुकचा सविस्तर तपशील.

**कायदेशीर मुदत संपली, तरीही प्रशासन सुस्त:**

माहिती अधिकार

**माहितीचा अधिकार हा नागरिकांचा कायदेशीर हक्क आहे. निवडणुकांसारख्या सार्वजनिक कामांमधील आर्थिक बाबींची माहिती दडवून ठेवणे संशयास्पद आहे. दोन महिने वाट पाहूनही नगर परिषदेने माहिती न दिल्याने मी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे दाद मागितली असून, दोषी जन माहिती अधिकाऱ्यावर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.**

**नरेंद्र वाडीभस्मे, खापा, तुमसर (अर्जदार)**

कायद्यानुसार अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत माहिती पुरवणे बंधनकारक आहे. अर्जदाराने सदर माहिती मशीघ्रम प्रवर्गात १५ दिवसांच्या आत व्यक्तीशः मागितली होती. २० एप्रिल २०२६ रोजी नगर परिषद तुमसर येथे हा अर्ज अधिकृतपणे स्वीकारण्यात (आवक-जावक नोंद) आला होता. मात्र, आज दोन महिने उलटून गेल्यानंतरही लेखा विभागाकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. ?नगर परिषदेच्या या दिरंगाईमुळे प्रशासकीय पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आता वरिष्ठ प्रशासन यावर काय कारवाई करते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# श्रमाला प्रतिष्ठा देण्यासाठी या सर्वेक्षणामध्ये सहभागी व्हावे :डॉक्टर मंगेश गोंदावले



**गोंदिया:-** केंद्र शासनाच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या मार्गदर्शनात तसेच अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयमार्फत नियतकालिक श्रम बल सर्वेक्षण (feriodic labour force surveẓ ( PLFS ) ) आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण (annual survey of uni cor{oration sector enterrises (ASUSE) सुरू झाले असून श्रमाला प्रतिष्ठा देण्यासाठी या सर्वेक्षणामध्ये सहभागी होऊन नागरिकांनी माहिती देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉक्टर मंगेश गोंदावले यांनी या दोन्ही सर्वेक्षणाच्या शुभारंभ प्रसंगी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी श्री गोंदावले यांच्या हस्ते आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी अभिजीत घोरपडे निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेर, जिल्हा सांख्यिकी विभागाचे उपायुक्त सुनील धोंगडे, जिल्हा कृषी अधिकारी निलेश कनवडे, सर्वेक्षण करणारे अन्वेषक यांच्या प्रमुख उपस्थितीत या दोन्ही सर्वेक्षणाचा शुभारंभ झाला. महाराष्ट्रात पी एल एफ एस आणि ए एस यु एस इ हे दोन्ही सर्वेक्षण जागतिक बँकेच्या सहाय्याने आणि महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागामार्फत महा स्ट्राइड प्रकल्पांतर्गत राबविण्यात येत आहे.

**नियतकालिक श्रम बल सर्वेक्षण**

नियतकालिक श्रम बल सर्वेक्षण ( PLFS) या माध्यमातून रोजगाराबाबत अद्यावत माहिती मिळणार आहे. जिल्ह्यातील स्त्री व पुरुष कामगारांचा प्रत्यक्ष सहभाग , ग्रामीण व शहरी बाजारातील रोजगार व बेरोजगार यांची सद्यस्थिती निश्चित माहिती उपलब्ध होणार आहे.

यातून मिळालेली माहिती जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील श्रमशक्ती रोजगाराची रचना आणि रोजगाराच्या आकडेवारीच्या प्राथमिक अधिकृत स्त्रोत आहे या सर्वेक्षणातून जिल्ह्यातील आणि महाराष्ट्राच्या रोजगार परिस्थितीबाबत अचूक व विश्वासार्ह माहिती उपलब्ध होईल जी धोरणे निश्चिती योजना आखणी आणि विकास कार्यक्रमाचे अंमलबजावणीसाठी आवश्यक असणार आहे.

या सर्वेक्षणाद्वारे वेगवेगळ्या क्षेत्रातील रोजगारांच्या स्थितीचा अचूक आढावा घेण्यात येईल. कौशल्य विकास कार्यक्रमांना दिशा देण्याकरिता व रोजगार निर्मितीच्या प्रभावी योजना राबविण्यासाठी पी एल एफ एस सर्वेक्षण निर्णायक ठरेल.

सर्वेक्षणातून प्राप्त माहिती ही जिल्ह्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासाचा अंदाज तयार करण्यास उपयुक्त ठरेल. रोजगार स्थितीनुसार कामगारांची विविध वर्ग उदाहरणार्थ नियमित वेतनधारक, स्वयंरोजगार, अनौपचारिक क्षेत्रातील कामगार यांचे प्रमाण समजण्यास मदत होते. त्याचप्रमाणे विविध निर्देशांकांची मोजणी करण्यात येते. जसे श्रम बल सहभाग दर (एल एफ पी आर) कामगार लोकसंख्या गुणोत्तर (डब्ल्यू पी आर) आणि बेरोजगार दर ( यु आर) व त्यामुळे अर्थव्यवस्थेतील रोजगार आणि स्थैर्याबाबत अंदाज येतो.

**असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण**

असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण ( अडणडए) च्या सर्वेक्षणातून उत्पादन व्यापार व इतर सेवा क्षेत्रातील असंघटित, बिगर कृषी आस्थापनाकडून माहिती घेतली जाणार आहे. यामध्ये उद्योग व्यापार व सेवा क्षेत्रातील आस्थापना चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी व त्यामधून उत्पादित होणारी वस्तू व सेवा याबाबत आर्थिक व कार्यात्मक माहिती घेण्यात येईल.

या सर्वेक्षणाद्वारे प्राप्त माहिती शास्त्र पद्धतीने तयार केलेल्या नमुना पद्धतीद्वारे संकलित करण्यात येणार आहे. अर्थव्यवस्थेतील असंघटित बिगर कृषी क्षेत्रांमधील लहान उत्पादक व्यापारी आणि सेवाप्रदाता क्षेत्रातील जसे वाहतूक, शिक्षण, आरोग्य इत्यादी यांची आर्थिक आणि कार्यात्मक वैशिष्ट्ये मोजण्याकरिता वापरली जाणार आहे. यामुळे या क्षेत्रातील उद्यमांचे स्वरूप, आकार, कार्यपद्धती, संसाधने, उत्पादन आणि सेवांची वितरण, खर्च आणि उत्पन्न यांची सविस्तर माहिती मिळते.

या सर्वेक्षणाच्या प्राप्त आकडेवारी मधून आपल्या जिल्ह्यातील असंघटित क्षेत्रातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची सद्यस्थिती जाणून घेऊन आपल्या जिल्ह्याचे आर्थिक विकासाच्या मोजमापा करिता विविध निर्देशांक परीगणित करण्यात येणार आहेत. या सर्वेक्षणाच्या आकडेवारी द्वारे रोजगार निर्मिती आणि जिल्ह्याच्या एकूण उत्पादनात झालेली वाढ परीगणित करण्यासाठी तसेच योजना तयार करण्यासाठी, धोरणात्मक नियोजन करण्याकरिता हे सर्वेक्षण महत्त्वाचे आहे.हे सर्वेक्षण संपूर्ण वर्षभर केले जाणार असून गोंदिया जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागातील पी एल एफ एस चे ७२ घटकांचे आणि ए एस यु एस इ चे ४९ घटकांचे सर्वेक्षण केले जाणार आहे.

ही संपूर्ण माहिती अशा स्त्रोक्त व तांत्रिक पद्धतीने निवड करण्यात आलेल्या कुटुंबाची माहिती संकलित करण्यात येणार आहे निवड झालेल्या घरी आलेल्या कुटुंबाने अन्वेषकाला माहिती देऊन सहकार्य करावे. प्राधिकृत प्रतिनिधी घरी येऊन आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे ( टॅबलेट अथवा लॅपटॉप द्वारे) संकलित करतील. नागरिकांकडून संकलित केलेली माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार आहे. या नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगाचे वार्षिक सर्वेक्षण गटात मोडणाऱ्या संस्था, तसेच एकल व्यक्ती यांनी सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉक्टर मंगेश गोंदवले यांनी केले. यामुळे जिल्ह्यातील पायाभूत बाबींवर योग्य निर्णय येत्या काळात घेतले जातील.

# फार्मर आयडी नोंदणी अनिवार्य

**गोंदिया :** राज्यात कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच अधिक पारदर्शकता वाढावी यासाठी फार्मर आयडी नोंदणी अनिवार्य करण्यात आलेले असून लवकरात लवकर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी फार्मर आयडी नोंदणी करून घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी डॉक. मंगेश गोंदावले यांनी केले आहे.१४ नोव्हेंबर २०२४ पासून ॲग्रीस्टॅक योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे. तसेच दि.१५ एप्रिल २०२५ पासून कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आलेली आहे.ज्या शेतकरी बांधव-भगिनींनी अद्याप आपली फार्मर आयडी काढलेली नाही, त्यांनी तात्काळ नोंदणी करुन घ्यावी. नोंदणी करण्यासाठी शेतकरी आपल्या नजिकच्या सेवा सुविधा केंद्रावर भेट देऊ शकतात किंवा स्वत:ही ॲग्रीस्टॅक पोर्टलवरुन ऑनलाईन नोंदणी करु शकतात.

# काँग्रेस पक्षाची आमगावात महत्त्वपूर्ण संघटनात्मक बैठक



**आमगाव:-** गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ नामदेवराव किरसान यांच्या आमगाव कार्यालयात गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण संघटनात्मक बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.बैठकीत काँग्रेस पक्षाची संघटना अधिक बळकट करण्यासाठी विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. आगामी काळात गावपातळीपासून बूथ स्तरापर्यंत पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच जनतेच्या समस्या, शेतकरी, युवक, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर काँग्रेस पक्षाने प्रभावीपणे आवाज उठवावा, यावर विशेष भर देण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष अमरभाऊ वराडे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना पक्षाची विचारधारा, संघटनात्मक शिस्त आणि जनसंपर्क वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी प्रत्येक कार्यकर्त्याने जनतेशी थेट संपर्क ठेवून त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि त्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन केले.

बैठकीत उपस्थित प्रदेश सचिव.पी.जी कटरे , तालुका अध्यक्ष संजय बहेकार खासदार प्रतिनिधी दुष्यंत किरसान. शहर अध्यक्ष देवकांत बहेकार, जगदीश भाऊ फुंडे, बाबा मिश्रा, युवक काँग्रेस आमगाव विधानसभा अध्यक्ष राहुल चुटे ,माजी जिल्हा सचिव गौरव बिसेन,महेश उके, प्रभाताई उपराडे , छबू उके, गीता महारवाराडे , मीनाक्षी महारवाराडे,पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आगामी कार्यक्रम, सदस्य नोंदणी अभियान, संघटन विस्तार आणि पक्ष बळकटीकरणाबाबत आपली मते मांडली. पक्ष संघटना तळागाळापर्यंत मजबूत करून आगामी काळात काँग्रेस पक्षाला अधिक सक्षम करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.बैठकीस उपस्थित सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने कार्य करून काँग्रेस पक्षाची विचारधारा जनतेपर्यंत पोहोचविण्याचा तसेच जनहिताच्या प्रश्नांसाठी संघर्ष करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# गोंदिया जिल्ह्यात २० जून रोजी वार्षिक सारस पक्षी गणना

**गोंदिया :** महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही वार्षिक सारस पक्षी गणनेचे आयोजन करण्यात आले असून ही गणना शनिवार, दि. २० जून २०२६ रोजी पार पडणार आहे. महाराष्ट्रात सारस पक्ष्यांचे वास्तव्य प्रामुख्याने गोंदिया व भंडारा जिल्ह्यांमध्ये आढळते. तसेच मध्य प्रदेशातील लगतच्या बालाघाट जिल्ह्यातही सारस पक्ष्यांची उल्लेखनीय संख्या आहे. या तिन्ही जिल्ह्यांमध्ये दरवर्षी सारस पक्षी गणना आयोजित करण्यात येते तसेच वर्षभर विविध संरक्षणात्मक उपक्रम राबविले जातात.या उपक्रमांतर्गत दि. १९ जून रोजी बालाघाट जिल्ह्यात आणि दि. २० जून रोजी गोंदिया जिल्ह्यात सारस पक्षी गणना करण्यात येणार आहे.

# आरोग्य विभागाचा नोडल अधिकारी डॉ. मडावींनी घेतला आढावा



**गोंदिया:-** के.टी. एस. सामान्य रुग्णालयातील सभागृहात मुंबई येथील उपसंचालक तथा जिल्ह्याचे राज्य नोडल अधिकारी डॉ. पुरुषोत्तम महावी यांचे अध्यक्षतेत व नागपूर विभागीय उपसंचालक डॉ. शशिकांत शंभरकर यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय आरोग्यविषयक आढावा सभा (ता. १०) रोजी पार पडली.

जिल्हास्तरिय आढावा सभेत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले. सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंद कुमार वाघमारे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तृप्ती कटरे, सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ. महेंद्र धनविजय, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. रोशन राऊत, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, विभागीय कार्यक्रम व्यवस्थापक मनिष नंदनवार, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. विनोद चव्हाण उपस्थित होते. राज्य नोडल अधिकारी डॉ. पुरुषोत्तम मडावी व नागपूर विभागीय उपसंचालक डॉ. शशिकांत शंभरकर यांनी गोंदिया जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाचा विस्तृत आढावा घेतला. त्यावेळेस जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी, बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व सर्व ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम योजनाचे जिल्हा समन्वयंक यांचा आढावा घेवुन मार्गदर्शन केले. आढावा सभेमुळे जिल्ह्यातील तळागाळातील लोकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्याच्या दृष्टीने नियोजन मार्गदर्शन करण्यात आले.

आढावा सभेदरम्यान सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम जसे माता व बाल संगोपन, हिवताप, क्षयरोग, कुष्ठरोग, सिकलसेल, किटकजन्य आजार, हत्तीपाय रोग, ॲनिमिया मुक्त भारत अभियान, संस्थात्मक प्रसुती, नियमित लसीकरण, कुपोषण, नवसंजीवनी योजना, साथरोग, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री टी. बी. मुक्त भारत अभियान, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, बाल सुरक्षा कार्यक्रम, कायाकल्प, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, आरोग्यवर्धिनी उपकेंद्र योजना, बांधकाम, १५ वित्तबाबी, आयुष, एनसीडी, कर्करोग तपासणी मोहिम, एच. पी. व्ही. लसीकरण, माझं गाव आरोग्य संपन्न गाव, यु. व्ही. न. लसीकरण पोर्टल, गुणवत्ता आश्वासन, जीवनविषयक आकडेवारी, ई संजीवनी, टेलीकन्सल्टेशन, पॅलेटिव्ह केअर, स्टेमी प्रकल्प ई. विविध बाबींचा आढावा घेवुन मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या.

जिल्ह्यात मातांना प्रसुतीपुर्व व प्रसुतीपस्चात आरोग्य सेवा देवुन सर्व आरोग्य कार्यक्रमाचे उद्दिष्ट पुर्ण करणे तसेच लोकांना गुणात्मक सेवा, जिल्ह्यातील वय १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींना गर्भाशय कर्करोग प्रतिबंधात्मक लसीकरण करून भविष्यात होणार्या आजारापासुन सुरक्षा प्रदान करणे, ग्रामीण रुग्णालयामध्ये बेड ऑक्युपन्सी रेट

वाढविणे, दोन कोटी महिलांची तपासणी करण्याच्या सुचना राज्य नोडल अधिकारी डॉ. पुरुषोत्तम मडावी यांनी आरोग्य विभागाला यावेळी दिल्या. आढावा सभेत जिल्हा माध्यम विस्तार अधिकारी विजय आखाडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संगीता भोयर, डॉ. ललित कुकडे, डॉ. निलेश जाधव, डॉ. स्वप्नील आत्राम, डॉ. सुकन्या कांबळे, डॉ. प्रणित पाटील तसेच वैद्यकीय अधिक्षक डॉ. संजय माहुले, डॉ. खुशबु महानंदीया, डॉ. नंदा गेडाम, डॉ. विजय पटले. डॉ. प्रशांत तुरकर, डॉ. राहुल शेंडे, डॉ. सचिन उईके, डॉ. गगन गुप्ता, डॉ. आशिश नाईक, डॉ. राऊत, डॉ. निकीता पोयाम, डॉ. गुरुप्रकाश खोब्रागडे, डॉ. वेदप्रकाश चौरागडे, डॉ. भारती जयस्वाल, अर्चना वानखेडे, उखादास बिसेन, मनिष मदने यांचेसह के. टी. एस. सामान्य रुग्णालय, बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय, जिल्हा परिषद आरोग्य विभाग व राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे कार्यक्रम समन्वयक उपस्थित होते.

# गोट फार्म हेच जीवनाचे ध्येय

## आमगावच्या तरुणाची रोजगारनिर्मितीची प्रेरणादायी यशोगाथा



**आमगाव :-** नोकरीच्या मागे धावण्याऐवजी स्वतःचा व्यवसाय उभारण्याचा निर्धार करून माली येथील सुशिक्षित तरुण राजेंद्र रामराज शेंडे यांनी शेळीपालन व्यवसायात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कोटा जातीच्या शेळ्या व बोकडांच्या संगोपनातून त्यांनी आधुनिक गोट फार्म उभारला असून, आज त्यांना या व्यवसायातून दरवर्षी चांगला आर्थिक लाभ मिळत आहे.

राजेंद्र शेंडे यांनी बी.ए. तसेच आयटीआय (ऑटोमोबाईल) शिक्षण पूर्ण केल्यानंतर नागपूर येथे ऑटोमोबाईल क्षेत्रात काम केले. कोरोनाच्या काळात परिस्थिती बदलल्यानंतर त्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. सखोल अभ्यास, नियोजनबद्ध तयारी आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी शेळीपालन व्यवसायाची निवड केली.

सुरुवातीला त्यांनी कोटा, सिरोही, सोजत, बारबेरी तसेच देशी जातीच्या शेळ्यांचे संगोपन केले. अनुभव आणि अभ्यासातून त्यांना असे लक्षात आले की कोटा जातीच्या शेळ्या अधिक उत्पादनक्षम असून त्यांची वाढ जलद गतीने होते. त्यानंतर त्यांनी पूर्णपणे कोटा जातीच्या शेळ्यांच्या संगोपन व व्यापारावर लक्ष केंद्रित केले.

**नकारात्मक विचारांना यशाने दिले उत्तर**

व्यवसायाच्या सुरुवातीच्या काळात अनेकांनी त्यांना राजस्थानातील शेळ्या महाराष्ट्राच्या हवामानात टिकणार नाहीत तसेच हा व्यवसाय फायदेशीर ठरणार नाही, असा सल्ला दिला. मात्र राजेंद्र शेंडे यांनी आपल्या अनुभवाने आणि यशाने या सर्व समजुती चुकीच्या ठरवल्या. त्यांच्या मते, कोटा जातीच्या शेळ्या महाराष्ट्रातील उष्णता, पावसाळा आणि थंडी या तिन्ही ऋतूंमध्ये सहजपणे जुळवून घेतात.

**उत्कृष्ट पशुपालक म्हणून गौरव**

राजेंद्र शेंडे यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत फेब्रुवारी २०२४ मध्ये त्यांचा उत्कृष्ट पशुपालक म्हणून सन्मान करण्यात आला. तसेच २०२५ मध्ये आयोजित तालुका पशु-पक्षी प्रदर्शनात उत्कृष्ट बोकड संगोपनासाठी प्रथम क्रमांक मिळाला. याशिवाय २०२६ च्या पशु-पक्षी प्रदर्शनात उत्कृष्ट शेळी-बोकड संगोपन गटात प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावत त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

**कोटा जातीची वैशिष्ट्ये**

कोटा जातीची शेळी साधारणपणे एका वेळी दोन ते तीन पिल्लांना जन्म देते. या जातीची वाढ इतर जातींच्या तुलनेत सुमारे ५० टक्के अधिक वेगाने होते. या जातीचे बोकड अवघ्या पाच महिन्यांत चांगले वजन प्राप्त करतात. त्यामुळे बकरी ईदच्या काळात त्यांना मोठी मागणी असते.

अलीकडेच राजेंद्र शेंडे यांनी सुमारे ५० बोकडांची विक्री केली. या जातीच्या शेळ्यांना सामान्य हिरवा व वाळलेला चारा पुरेसा ठरतो, त्यामुळे संगोपनाचा खर्चही तुलनेने कमी राहतो.

**युवकांना देत आहेत मार्गदर्शन**

राजेंद्र शेंडे केवळ स्वतःचा व्यवसाय करत नाहीत, तर ग्रामीण भागातील युवकांना शेळीपालनाचे प्रशिक्षण व मार्गदर्शनही देत आहेत. त्यांचे मत आहे की योग्य माहिती, तांत्रिक ज्ञान आणि नियोजनबद्ध पद्धतीने व्यवसाय केल्यास तोट्याची शक्यता अत्यंत कमी राहते.

**रोजगाराचे नवे साधन**

राजेंद्र शेंडे यांच्या मते, सध्या राजस्थानातून मोठ्या प्रमाणात बोकड महाराष्ट्रात आणले जातात. जर महाराष्ट्रातील युवकांनी मोठ्या प्रमाणावर हा व्यवसाय स्वीकारला, तर ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील आणि स्थानिक पातळीवर दर्जेदार बोकड उपलब्ध होतील.

भविष्यात कोटा जातीच्या शेळ्या व बोकड स्थानिक स्तरावर उपलब्ध करून देणे आणि युवकांना आत्मनिर्भर बनविणे, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.

अभ्यास, मेहनत, जिद्द आणि योग्य नियोजनाच्या बळावर ग्रामीण युवकही मोठ्या प्रमाणात यशस्वी उद्योजक बनू शकतात. राजेंद्र रामराज शेंडे यांचे यश हे त्याचे जिवंत उदाहरण आहे.

# पदोन्नतीमध्ये सेवाजेष्ठ शिक्षकांना डावलल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

## जिल्हा परिषद गोंदिया येथील टीईटी/सीटीईटीधारक सेवाजेष्ठ शिक्षकांचा इशारा



**अर्जुनी/मोरगाव:-** जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत सुरू असलेल्या शिक्षक पदोन्नती प्रक्रियेत सेवाजेष्ठ व टीईटी/सीटीईटी उत्तीर्ण शिक्षकांना डावलण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा टीईटी/सीटीईटीधारक शिक्षक तसेच जिल्ह्यातील सर्व सेवाजेष्ठ शिक्षकांनी दिला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा प्रवेश नियम, १९६७ तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचा सन्मान राखून पदोन्नतीसाठी सेवा जेष्ठ शिक्षकांनी कठोर परिश्रम करून १/९/२०२५ नंतर टीईटी/सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे असे असताना सुद्धा सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या पूर्वी म्हणजे १/९/२०२५पूर्वी टीईटी/सिटीईटी पात्रता धारण करणाऱ्यांना पदोन्नती देण्यात यावे या संचालकचया पत्रकामुळे संपूर्ण राज्यात प्राथमिक शिक्षकांच्या पदोन्नतीमध्ये घोळ निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा प्रवेश नियम तसेच प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जिल्ह्याची पदोन्नती प्रक्रिया सुरू झालेल्या दिनांकास टीईटी किंवा सीटीईटी उत्तीर्ण असलेल्या सेवाजेष्ठ शिक्षकांना पदोन्नतीमध्ये प्राधान्य देण्यात यावे, अशी भूमिका शिक्षकांनी मांडली आहे.

शिक्षकांच्या मते, सेवाजेष्ठता व आवश्यक शैक्षणिक पात्रता असलेल्या शिक्षकांना न्याय मिळाला नाही तर जिल्हा परिषद गोंदिया कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल. शासन व प्रशासनाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन करून पात्र शिक्षकांवर अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

पदोन्नती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता राखून पात्र व सेवाजेष्ठ शिक्षकांना न्याय देण्यात यावा, अन्यथा राज्यव्यापी आंदोलनात गोंदिया जिल्ह्यातील शिक्षकही सक्रिय सहभाग घेतील, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

